ठाणे, सोमवार दि. २६ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : ११९ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

## बंद मागे, निषेध सुरू

ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमध्ये घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्यावतीने याआज शनिवारी रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती. मात्र, महाराष्ट्र बंदच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती ......पान २ वर

# केंद्राप्रमाणे राज्यातही लागू होणार नवीन पेन्शन योजना



**केंद्र सरकारने काल मोठा निर्णय घेत सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन पेन्शन योजना लागू केली होती. तशाच प्रकारची योजना आता राज्यातील शासकीय कर्चमाऱ्यांनाही लागू करण्यात आली आहे. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय इतर काही महत्त्वाचे निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले आहेत.**

शनिवारी केंद्रातील मोदी सरकारने सरकारी कर्मचाऱ्यासाठी नवीन यूनिफाइड पेन्शन योजना जाहीर केली होती. या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार असल्याचे सरकारद्वारे म्हटलं होतं. तसेच जर पेन्शनधारकाचे निधन झाले, तर त्याच्या कुटुंबाला मृत्युवेळी मिळणाऱ्या पेन्शनच्या ६० टक्के रक्कम दिली जाईल, असेही सरकारकडून सांगण्यात आलं होतं. याशिवाय नोकरदाराने १० वर्षांच्या सेवेनंतर नोकरी सोडली, तर त्याला १० हजार रुपये पेन्शन मिळेल, अशी माहितीही केंद्र सरकारकडून देण्यात आली होती.

हीच योजना आता राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनासुद्धा लागू करण्यात आली आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२४ पासून या योजनेची अंमलबावणी करण्यात येणार आहे. राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार असल्याचे राज्य सरकारकडून सांगण्यात आलं आहे.

### मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय (संक्षिप्त) :

- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू. मार्च २०२४ पासून अंमलबावणी. लाखो कर्मचाऱ्यांना फायदा
- राज्यातील जास्तीत- जास्त शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज देणार. योजनेची व्याप्ती वाढवली
- गटप्रवर्तकांच्या मानधनात ४ हजारांची भरीव वाढ **(पान २ वर)**

जळगाव येथे लखपती दीदी कार्यक्रम

# महिलांवर अत्याचार अक्षम्य अपराध, तो करणारा कोणीही सुटता कामा नये



## नव्या कायद्यात लौंगिक अत्याचारावर फाशी, जन्मठेपेची तरतूद

नव्या कायद्यात अल्पवयीन मुलींवरील लैंगिक शोषणावर फाशी आणि जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केली आहे. लग्नाच्या नावाने मुलींची फसवणूक केली जायची. त्यावर शिक्षा होत नव्हती. आता यावर आम्ही कायदे केले आहे. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी केंद्र सरकार महिलांच्या सोबत आहे. राज्याच्या सोबत आहे. अत्याचार करणारी मानसिकता आपल्याला दूर करायची आहे, असेही नरेंद्र मोदी म्हणाले.

### अत्याचार करणाऱ्यांवर कठोर शिक्षा देणार

महिलांवर अत्याचार करणाऱ्यांवर कठोर शिक्षा देण्यासाठी आमचं सरकार कायदा कडक करत आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने महिला आल्या आहेत. आधी तक्रार येत होती, वेळेत एफआयआर होत नाही. सुनावणी होत नाही. खटला उशीरा सुरू होतो. निर्णय उशिरा येतो. या अडचणी भारतीय न्याय संहितेतून दूर केला आहे. एक चॅप्टर महिला आणि बाल अत्याचाराचा आहे. पीडित महिलांना पोलीस ठाण्यात जायचं नसेल तर ई एफआयआर करू शकते. ई एफआयआरमध्ये कोणी छेडछाड करणार नाही याचीही व्यवस्था केली आहे. त्यामुळे चौकशी चांगली होईल आणि दोषींवर शिक्षा करण्यास मदत होईल, असे नरेंद्र मोदींनी म्हटले.

**जळगाव : गेल्या काही दिवसांपासून राज्यासह देशात महिला अत्याचारावरील गुन्ह्यात मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रात बदलापुरात दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. या प्रकरणावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीकास्त्र डागले. आता महिला अत्याचारावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महत्त्वाचे भाष्य केले आहे. महिलांवर अत्याचार अक्षम्य अपराध आहे. तो करणारा कोणीही सुटता कामा नये, असे त्यांनी परखडपणे म्हटले आहे.** (पान २ वर)






केंद्र सरकारची लखपती दीदी योजना ... (सविस्तर वृत्त पान २)

# गोविंदा सराव पथकांना क्रेन, दोरी आणि हुक पुरवणार, सुरक्षेसाठी उपाययोजना

**गोविंदा सराव पथकांना मुंबई महापालिकेने क्रेन आणि दोरी व सुरक्षिततेसाठी सेफ्टी बेल्ट पुरवावे असे आदेश पालकमंत्री दीपक केसरकर यांनी मुंबई महापालिका प्रशासनाला दिले आहेत. गणेशोत्सवासाठी मुंबई महापालिका एवढा खर्च करीत असते तर दहिहंडी उत्सवासाठी खर्च करायला काय हरकत आहे अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.**

### पालकमंत्र्यांचे आदेश

**मुंबई:** गोविंदा, दहिहंडी आणि उंच मानवी थर ही मुंबईची संस्कृती आणि ओळख आहे. ही ओळख टिकावी म्हणून प्रो गोविंदासाठी जिल्हा विकास नियोजन विभागातून दोन कोटींचा निधी देण्यात आला. मात्र मुंबईत विविध ठिकाणी जी गोविंदा पथके सराव करीत असतात त्यांना मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयांनी क्रेन, दोरी, सेफ्टी बेल्ट पुरवावे असे आदेश पालकमंत्री दीपक केसरकर यांनी दिले आहेत. तसेच मंगळवारी गोपाळकालाच्या दिवशी देखील ही सेवा पुरवावी, असेही आदेश त्यांनी दिले आहेत. वरच्या दोन तीन थरांवर असलेल्या गोविंदांच्या सुरक्षेसाठी या उपाययोजना कराव्यात. दुर्घटना घडून कोणती जिवितहानी होऊ नये याकरीता सुरक्षिततेच्या उपाययोजना म्हणून हा खर्च करावा असेही आदेश त्यांनी दिले आहेत. हे पहिलेच वर्ष असून किती आणि कशाप्रकारे क्रेन पुरवता येतील त्याचा विचार करावा व पुढीलवर्षी जास्तीतजास्त मंडळांना क्रेन पुरवाव्या असेही त्यांनी पालिका प्रशासनाला सांगितले.



# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## भारत - युक्रेन मैत्रीचे नवे पर्व

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच युक्रेनचा दौरा पूर्ण केला आहे. युक्रेनला भेट देणारे पंतप्रधान मोदी हे पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत. पंतप्रधान मोदी आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांचे अधिकृत निवासस्थान मारिन्स्की पॅलेस येथे अनेक व्यापक विषयांवर चर्चा झाली. या परदेश भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्यात व्यापक विषयांवर चर्चा झाली. पंतप्रधान मोदींनी कीवमधील ओएसिस ऑफ पीस पार्कमधील महात्मा गांधींच्या पुतळ्याला आदरांजली वाहिली आणि युद्धात मारल्या गेलेल्या युक्रेनमधील मुलांच्या स्मृती स्थळाला भेट देऊनही श्रद्धांजली वाहिली. या भेटीचा उद्देश युक्रेन आणि भारत यांच्यामध्ये दृढ मैत्रीचे संबंध वृद्धिंगत व्हावेत असा होता. जगात शांतता प्रस्थापित होण्यासाठी भारताचे प्रयत्न सुरू आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले आहे. मोदींनी एक्स या समाज माध्यमावर लिहिले आहे की, माझी युक्रेन भेट ऐतिहासिक होती. भारत-युक्रेन मैत्री अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने मी युक्रेनला गेलो. माझी राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा झाली. शांतता प्रस्थापित झाली पाहिजे यावर भारताचा विश्वास आहे. मी युक्रेनचे सरकार आणि लोकांच्या आदरातिथ्याबद्दल त्यांचे आभार मानतो. पंतप्रधान मोदींच्या या दौर्यात अनेक विषयांवर चर्चा झाली. युक्रेन युद्धावर भारताने त्रयस्थ भूमिका घेतल्याचा दावा पंतप्रधान मोदींनी फेटाळून लावला आहे. मोदी यांनी हा दावा फेटाळून लावताना म्हटले आहे की , संघर्षाच्या सुरुवातीपासून भारताने कधीही त्रयस्थ भूमिका घेतली नाही. भारत नेहमीच शांततेच्या बाजूने आहे, असे ते म्हणाले. फेब्रुवारी २०२२ मध्ये युक्रेनमध्ये रशियाच्या विशेष लष्करी कारवाईचा निषेध न केल्याबद्दल भारत सुरुवातीपासून अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांकडून आक्षेप घेत आहे. पाश्चिमात्य देशांनी मॉस्कोवर अनेक निर्बंध लादले आहेत, तर भारताने या दोघांमधील संबंध संतुलित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. भारताने मॉस्कोशी आपले अनेक दशके जुने धोरणात्मक संबंध कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. रशियाच्या मॉस्को येथून भारताला बरेचसे लष्करी उपकरणदेखील पुरवले जाते. रशिया आणि युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावण्याची भारताची इच्छाही मोदींनी व्यक्त केली. भारत जागतिक शांततेच्या कोणत्याही प्रयत्नांमध्ये सक्रिय भूमिका बजावण्यास तयार आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे. शांततेच्या निराकरणाचा मार्ग केवळ संवाद आणि मुत्सद्देगिरीने शोधला जाऊ शकतो आणि वेळ न घालवता त्या दिशेने वाटचाल करायला हवी. या संकटातून मार्ग काढण्यासाठी दोन्ही बाजूंनी एकत्र बसायला हवे, असे पंतप्रधान मोदी यांनी सूचित केले आहे. जुलैमध्ये नुकत्याच झालेल्या रशिया दौऱ्यावर झेलेन्स्की यांच्यासह काहींनी पंतप्रधान मोदींवर टीकाही केली होती. पंतप्रधान मोदींनी काही काळापूर्वी रशिया दौर्यादरम्यान राष्ट्राध्यक्ष पुतिन यांची भेट घेतली होती, अगदी त्याचदिवशी रशियाच्या क्षेपणास्त्रांनी युक्रेनमधील विविध ठिकाणांना लक्ष्य केले होते. या घटनेत कीवच्या रुग्णालयातील मुलांसह अनेक लोकांचा मृत्यू झाला होता. झेलेन्स्की यांनी या हल्ल्यावेळी मोदींच्या भेटीचा उल्लेख, शांतता प्रयत्नांना मोठी निराशा, असा केला होता. त्यावेळी रशियन क्षेपणास्त्राने युक्रेनमधील मुलांच्या सर्वात मोठ्या रुग्णालयावर हल्ला केला. तरुण कर्करोगाच्या रुग्णांना लक्ष्य केले. बरेच लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले, असे झेलेन्स्की यांनी त्यावेळी एक्सवर लिहिले होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या नेत्याने अशा दिवशी मॉस्कोमध्ये जगातील सर्वात मोठ्या गुन्हेगाराला मिठी मारताना पाहणे ही एक मोठी निराशा आणि शांतता प्रयत्नांना एक धक्का आहे, असे झेलेन्स्की यांनी म्हटले होते. मोदींनी रशियाच्या दौऱ्यावर असताना मुलांच्या रुग्णालयावरील हल्ल्याचा संदर्भ देत निष्पाप मुलांची हत्या हृदयद्रावक आणि अत्यंत वेदनादायक असल्याचे म्हटले होते. या विषयावर नुकतीच मला तुमच्याशी बोलण्याची संधी मिळाली, असे मोदी पुतिन यांना म्हणाले. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीदेखील रशिया आणि युक्रेनमध्ये शांतता निर्माण करण्याची भारताची इच्छा दर्शविली. शांततेसाठी नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी सर्व भागधारकांमध्ये व्यावहारिक सहभागाची गरज आहे. युक्रेन जागतिक शांतता परिषदेत भारताचा सहभाग कायम ठेवू इच्छित आहे, असे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी म्हटले आहे. त्यांनी मोदी आणि झेलेन्स्की यांच्यातील चर्चा अतिशय तपशीलवार आणि अनेक प्रकारे रचनात्मक असल्याचे म्हटले. चर्चा पुढे नेण्याचे प्रभावी मार्ग कोणते असू शकतात, यावरही चर्चा झाल्याचे जयशंकर यांनी म्हटले आहे. पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्यातील बहुतांश चर्चा युक्रेनमधील युद्धासंदर्भात होती. दोन वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीरपणे म्हटले होते की, हे युद्धाचे युग नाही आणि संवाद व मुत्सद्दीपणा या महत्त्वाच्या गोष्टी आहेत; युद्धातून तोडगा निघणार नाही. मोदी आणि झेलेन्स्की यांच्यात भवितव्यात धोरणात्मक भागीदारी वाढवण्याविषयी चर्चा झाली. या दौऱ्यादरम्यान दोन्ही देशांमध्ये अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. भारत आणि युक्रेनने कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आणि मानवतावादी सहाय्य या क्षेत्रात सहकार्य करण्यासाठी करार केला आहे. व्यापार, आर्थिक समस्या, संरक्षण, औषधनिर्माण, कृषी, शिक्षण या विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली आहे. मोदींनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांना सोयीस्कर वेळी भारत भेटीचे निमंत्रण दिले आहे. या भेटीत भारताने युक्रेनला २२ टन किमतीची वैद्यकीय मदत उपकरणे सुपूर्द केली आहेत. भीष्म क्यूब म्हणून ओळखले जाणारे उपकरण, आपत्ती झोनमध्ये जलद तैनातीसाठी डिझाइन केलेले एक अत्याधुनिक मोबाइल रुग्णालय आहे. सर्व आवश्यक औषधे आणि उपकरणे क्यूबिकल बॉक्समध्ये (प्रत्येकी १५ इंच) सुव्यवस्थित पद्धतीने पॅक करून मोबाइल रुग्णालय तयार केले जाते. तसेच युद्ध किंवा नैसर्गिक आपत्तीमध्ये कोणत्या प्रकारच्या दुखापती व वैद्यकीय समस्या येऊ शकतात, यानुसार त्याची व्यवस्था केली जाते. युक्रेन आणि भारताच्या प्रमुख नेत्यांच्या भेटीमुळे व झालेल्या करारांमुळे दोन्ही देशांत मैत्रीचे नवे पर्व सुरू झाले आहे, असे म्हणता येईल.

■ केंद्र सरकारची लखपती दीदी या योजना :

# महिलांना मिळणार ५ लाख रुपयांपर्यंत मदत

**सध्या राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची चांगलीच चर्चा होत आहे. या योजनेच्या माध्यमातून सरकारतर्फे महिलांना प्रतिमहिना १५०० रुपयांची मदत दिली जाणार आहे. अशाच प्रकारची योजना सर्वप्रथम मध्य प्रदेशमध्ये राबवण्यात आली होती. सध्या एकूण सात राज्यांत महिलांना आर्थिक स्वरुपात मदत करणाऱ्या अशाच प्रकारच्या योजना राबवल्या जात आहेत. एकीकडे लाडकी बहीण योजनेला महाराष्ट्रात लोकप्रियता मिळालेली असताना आता केंद्र सरकारची लखपती दीदी ही योजनेदेखील चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना पाच लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत केली जाते. त्यामुळे ही योजना नेमकी काय आहे? या योजनेचे स्वरुप काय आहे? हे जाणून घेऊ या....**

### योजनेचा उद्देश काय?

केंद्र सरकारने आतापर्यंत अनेक योजना आणल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून महिला सशक्तिकरणावर सरकारचा विशेष भर आहे. महिलांची आर्थिक, सामाजिक प्रगती व्हावी यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सरकारकडून लखपती दीदी ही योजना राबवली जात आहे. गेल्या वर्षी केंद्र सरकारने ही योजना चालू केलेली आहे. उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा हा उद्देश समोर ठेवून ही योजना चालू करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून सरकारतर्फे महिलांना पाच लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज दिले जाते.

### पाच लाख रुपयांपर्यंत मिळणार मदत

ही योजना महिला बचत गटाशी जोडल्या गेलेल्या महिलांना आर्थिक मदत करण्यासाठी चालू करण्यात आलेली आहे. महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढावे यासाठी प्रयत्न केले जाते. महिलांमध्ये स्वयंरोजगाराची निर्मिती व्हावी, असाही उद्देश या योजनेमागे आहे. या योजनेच्या मदतीने महिलांना कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देण्यात येते. त्यानंतर स्वत:चा उद्योग उभा करण्यासाठी या महिलांना एक लाख रुपयांपासून ते ५ लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज दिले जाते. एकूण तीन कोटी महिलांना या योजनेच्या माध्यमातून जोडण्याचा केंद्र सरकारचा उद्देश आहे.



### योजनेच्या लाभासाठी नेमकी अट काय?

या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर काही अटींची पूर्तता करणे गरजेचे आहे. या योजनेसाठी अर्ज करायचा असेल तर अर्जदार महिलेच्या घरातील कोणताही सदस्य शासकीय नोकरदार नसायला हवा. ज्या महिलांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा महिला अर्ज करण्यासाठी

### योजनेच्या लाभासाठी अर्ज कसा करायचा?

लखपती दीदी योजनेचा लाभ मिळवायचा असेल तर महिलांना बचत गटाच्या माध्यमातून एका उद्योगाचे नियोजन करावे लागेल. या उद्योगाचा आराखडा सरकारला पाठवला जाईल. या आराखड्याचा तसेच लखपती दीदी योजनेसाठीच्या अर्जाची सरकार पडताळणी करेल. त्यानंतर सर्व अटींची पूर्तता होत असेल तर महिलांना पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाईल.

# 'स्वातंत्र्यानंतर मोदी सरकार इतके काम कोणी केले नाही'; पंतप्रधान नरेंद्र मोदींचा छातीठोक दावा



जळगाव : एक महिला लखपती झाली तर पूर्ण परिवाराचे भाग्य बदलते. भारत जगाची तिसरी ताकद बनत आहे. त्यात महिलांचे मोठे योगदान आहे. याआधी अशी स्थिती नव्हती. मागील सरकारचे ७ दशक आणि मोदी सरकारचे १० वर्ष तराजूत तोला. स्वातंत्र्यानंतर मोदी सरकार इतके काम कोणी केले नाही, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. जळगाव येथे आयोजित लखपती दीदी कार्यक्रमातून ते बोलत होते.

व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, राज्यमंत्री प्रतापराव जाधव, क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत पुनर्वसन मंत्री अनिल पाटील आदी उपस्थित होते. महाराष्ट्रातील माझ्या बंधू भगिनींना जय श्रीकृष्ण. उद्या श्रीकृष्ण जयंती आहे मी तुम्हाला आजचं शुभेच्छा देतो, असे मराठीत म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. ते पुढे म्हणाले की, नेपाळ बस दुर्घटनेत आपण जळगावातील अनेक सहकाऱ्यांना गमावले. जेव्हा ही घटना घडली भारत सरकारने त्वरित नेपाळ सरकारचे संपर्क साधला. आपण मंत्री रक्षा खडसे यांना त्वरित नेपाळला जाण्यास सांगितले. दुर्घटनेत मृत पावलेल्या लोकांचे मृतदेह आपण विशेष विमानाने परत आणले. जे जखमी आहेत त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जखमी लवकर बरे व्हावेत अशी मी प्रार्थना करतो. पीडित कुटुंबियांना केंद्र आणि राज्य सरकारकडून पूर्ण मदत मिळणार आहे.

### नार-पार गिरणा योजनेला मान्यता - फडणवीस

नार-पार गिरणा योजनेच्या टेंडरला मान्यता दिल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थित येथे आज रविवारी 'लखपती दीदी' मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, यावेळी ते बोलत होते. नार-पार गिरणा योजनेमुळे जळगाव जिल्ह्याचे चित्र बदलणार असून, शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वामध्ये या योजनेला आम्ही मान्यता दिली आहे. आजच कॅबिनेटमध्ये आम्ही त्याला टेंडर काढण्याची मान्यता देतो आहोत, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. जळगाव जिल्हा सुजलाम-सुफलाम करण्याचं काम हे आपण या ठिकाणी करतो आहे. वाघूर प्रकल्पाला २२८८ कोटी, पाडळसे प्रकल्पाला ४८९० कोटी, अशाप्रकारे शेतकऱ्याला ही सुजलाम-सुफलाम करण्याचं काम आपण या माध्यमातून करतोय, असेही



### नेपाळ दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख मिळणार

जळगाव: नेपाळ येथील काठमांडू येथे देवदर्शनासाठी जात असताना भाविकांची बस दरीत कोसळली होती. या दुर्दैवी अपघातात जळगावच्या २६ भाविकांचा मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह हे नुकतेच जळगाव विमानतळ येथे दाखल झाले आहे. त्यानंतर अपघातातील मृतांवर जळगावच्या भुसावळ तालुक्यातील वरणगाव, तलवेळ, सुश्री गावात एकाच वेळी अंत्य संस्कार करण्यात आलेत. दरम्यान, या नेपाळ येथील दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्याच्या कुटुंबियांसोबत सरकार उभे असून मदतनिधी म्हणून ५ लाख रुपयांची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत काल रविवारी 'लखपती दीदीं'चा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. जळगाव विमानतळ परिसरात हा कार्यक्रम होत आहे. या मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्र्यांनी या दुर्घटनेबाबत शोक व्यक्त करत कुटुंबियांना मदतनिधीची घोषणा केली आहे.

### लाखो बहिणींना लखपती दीदी बनण्यासाठी मदत मिळणार

आज लखपती दीदीचे हे महासंमेलन पार पडत आहे. माझ्या सर्व लाडक्या बहिणी येथे मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. आज इथून देशभरातून लाखो बहिणींसाठी सहा हजार करोड रुपयांची राशी जारी करण्यात आली आहे. लाखो बचत गटांनी जोडल्या गेलेल्या महाराष्ट्रातील बहिणींना सुद्धा कोट्यावधी रुपयांची मदत मिळाली आहे. या पैशांनी लाखो बहिणींना लखपती दीदी बनण्यासाठी मदत मिळणार आहे. माझ्या सर्व माता आणि भगिनींना शुभेच्छा.

### स्वातंत्र्यानंतर मोदी सरकार इतके काम कोणी केले नाही

मागील एक वर्षात १ करोड लखपती दीदी झाल्यात. मागील दोन महिन्यांत ११ लाख झाल्यात. महाराष्ट्र सरकारने ही यात मोठे योगदान दिले. लखपती दीदी हे अभियान येणाऱ्या पिढीला सशक्त करणारे अभियान आहे. मुलगी जेव्हा कमवायला लागते तर तिचा अधिकार, मान सन्मान वाढतो. एक महिला लखपती झाली तर पूर्ण परिवाराचे भाग्य बदलते. भारत जगाची तिसरी ताकद बनत आहे. त्यात महिलांचे मोठे योगदान आहे. याआधी अशी स्थिती नव्हती. छोटं मोठं काम करण्याची इच्छा असूनही करता येत नव्हते. काही झाले तरी माता बहिणींची समस्या दूर करण्याचा निर्धार आम्ही केला. मागील सरकारचे ७ दशक आणि मोदी सरकारचे १० वर्ष तराजूत तोला. स्वातंत्र्यानंतर मोदी सरकार इतके काम कोणी केले नाही. आज घर महिलांच्या नावावर होत आहे. जनधन खाते उघडले आहे. मुद्रा योजनेत बिना गॅरंटीचे कर्ज द्या, गॅरंटी पाहिजे तर मोदी आहे, असे त्यांनी यावेळी म्हटले.

### मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय (संक्षिप्त) :

(पान १ वरून) ■ राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू.मार्च २०२४ पासून अंमलबावणी. लाखो कर्मचाऱ्यांना फायदा ■ राज्यातील जास्तीत- जास्त शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज देणार. योजनेची व्याप्ती वाढवली ■ गटप्रवर्तकांच्या मानधनात ४ हजारांची भरीव वाढ ■ ऑलिंपिकवीर स्व. पै.खाशाबा जाधव कुस्ती संकुलाच्या कामास वेग देणार ■ थकीत देण्यांसाठी महावितरण कंपनीस कर्जाकरिता शासन हमी ■ पर्यायी खडकवासला फुरसुंगी बोगदा काढणार. पुणे परिसरास सिंचन, पिण्यासाठी अधिक पाणी उपलब्ध होणार ■ नार-पार-गिरणा नदी जोड प्रकल्प. ७ हजार १५ कोटीस मान्यता. नाशिक, जळगाव जिल्ह्याला सिंचनाचा मोठा फायदा ■ सहकारी साखर कारखान्यांना शासन हमीवरील कर्ज परतफेडीसाठी संपूर्ण संचालक मंडळावर जबाबदारी ■ शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या ३० ऑगस्टपर्यंत ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी महामंडळ. सव्वा कोटी ज्येष्ठांना लाभ ■ ठाणे येथील महत्वाकांक्षी क्लस्टर योजनेसाठी महाप्रित ५ हजार कोटी निधी उभारणार ■ 'बार्टी' च्या 'त्या' ७६३ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा संपूर्ण लाभ ■ मुंबई महानगरात रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना झपाट्याने पूर्ण करणार. विविध महामंडळे प्रकल्प राबविणार ■ कोल्हापूरचे वारणा विद्यापीठ समूह विद्यापीठ ■ कळंबोली येथील पशुवैद्यकीय रुग्णालयासाठी भाडेपट्टा, सेवाशुल्क माफ ■ चिपळूण, रामटेक, इचलकरंजी येथील जमिनीच्या आरक्षणात फेरबदल ■ श्रीमंत उदयनराजे भोसले यांच्या सरंजाम जमिनींना देण्यात आलेली सूट वंशपरंपरेने त्यांच्या वारसांना ■ पाचोऱ्यातील सहकारी सूत गिरणीस शासन अर्थसहाय्य ■ सहकार भवनासाठी सायन येथील म्हाडाची जमीन

### महिलांवर अत्याचार अक्षम्य

### अपराध, तो करणारा कोणीही सुटता कामा नये

(पान १ वरून)
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज जळगाव येथे लखपती दीदी कार्यक्रम पार पडला. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले आहे. ते म्हणाले की, आज तिन्ही सैन्य दलात महिला अधिकारी आहेत. फायटर, पायलट महिला बनत आहेत. नारिशक्ती नवा कायदा बनवला. राजकारणात महिलांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले. सुरक्षेसाठी महत्व दिले.

■ **महिलांच्या समस्यांसाठी केंद्र सरकार राज्यासोबत** – महिलांवरील होणारे अत्याचार अक्षम्य पाप आहे. दोषी कोणीही असेल त्याला सोडू नका. त्याला कुठल्याही प्रकारे मदत करणारे वाचता कामा नये. पोलीस आणि कुठल्याही स्तरावर कारवाई झाली पाहिजे. सरकार येतील अन् जातील, पण नारी शक्तीकडे लक्ष दिले पाहिजे. महिलांच्या रक्षणासाठी कायदे कठोर केले जात आहे. एफआयआर होत नाही, वेळ लागतो अशा अडचणी येत होत्या. मात्र आता अनेक अडचणी आम्ही न्याय संहितामधून दूर केल्या आहेत. ई-एफआयआर सुरू केल्या आहे. याने गडबड होणार नाही, आता जलद प्रतिसाद मिळेल. फाशी आणि जन्मठेपेची शिक्षा दिली जात आहे. लग्नाच्या नावे फसवणूक होत होती, त्याबाबत कायदा केला आहे. महिलांच्या समस्यांसाठी केंद्र सरकार हे राज्य सरकारच्या सोबत आहे, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

■ **महायुतीचे सरकार म्हणजे उद्योग आणि नोकरीची गॅरंटी** – ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र विकसित भारताचा चमकता तारा आहे. गुंतवणूकीसाठी आणि नोकरीसाठी चांगला आहे. महायुतीचे सरकार म्हणजे उद्योग आणि नोकरीची गॅरंटी आहे. अनेक वर्ष स्थिर सरकारसाठी महायुतीच्या सरकारची गरज आहे. इथल्या महिला माझी साथ देतील, असेही त्यांनी यावेळी म्हटले.


कल्याण डोंबिवली महानगरपलिका, कल्याण
बांधकाम विभाग
निविदा सुचना क्र. १८ (२०२४-२५)

प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे कल्याण डोबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील ९ कामांकरीता B-1 नमुन्यात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवित आहेत.
कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटी शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्राचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २६/०८/२०२४ ते दि. २/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या निविदा ह्या दि. २/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर अपलोडकरणेत याव्यात. प्राप्त निविदा दि. ०३/०९/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.
कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासकांनी राखून ठेवला आहे, याबद्दलचा त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहील.
निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तळ टिप : मी भारताचे भविष्य आहे, मी आता मतदार आहे !

जा. क्र. कडोंमपा / जसंवि/मुका/१५७४
दि. २३/०८/२०२४
सही/-
शहर अभियंता
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण



ठाणे महानगरपालिका, ठाणे
घनकचरा व्यवस्थापन विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेमार्फत " ठाणे महापालिका क्षेत्रातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन मौजे आतकोली येथे करणेकरिता उभारण्यात आलेल्या प्रकल्पाचे परिचालन व निगा देखभाल करणेकरिता" या कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था / महानगरपालिका इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.२६/०८/२०२४ ते दि.०२/०९/२०२४ रोजी पर्यंत उपलब्ध असून, ऑनलाईन निविदा दि.०२/०९/२०२४ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.०३/०९/२०२४ रोजी सायं.१६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.
ठामपा/पिआरओ/घ.क.व्य/३६३/२०२४-२५
दि:२३.०८.२०२४
Pls visit our official web-site
www.thanecity.gov.in
सही/-
उपआयुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
ठाणे महानगरपालिका,ठाणे



मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय,भाईंदर (प.)
जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८ Email :- pro@mbmc.gov.in
माहिती व जनसंपर्क विभाग

जा.क्र. मनपा/मावज /ई २६६८१८५/२०२४-२५ दि. २४/०८/२०२४

// मुदतवाढ //

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि. ०७/०८/२०२४ रोजीच्या पुढारी, नवशक्ती व महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली फेर-निविदा सुचना क्र. १५ (२०२४-२५) (2024_MBMC_1067248_1) या कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ दि. २३/०८/२०२४ रोजी दुपारी १.०० पर्यंत देण्यात आली होती. सदर कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ वाढवून दि. ३०/०८/२०२४ रोजी दुपारी १.०० पर्यंत करण्यात येत आहे. तसेच सदर निविदेची तांत्रिक बिड दि. ०२/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

जा.क्र.मनपा/मावज/ई२६६८१८५
दि. २४/०८/२०२४
सही/-
(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका



ठाणे महानगरपालिका, ठाणे
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील आकांक्षी शौचालयाची रचना, बांधकाम, ऑपरेशन आणि देखभाल करणे या कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिका इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.२६.८.२०२४ ते दि.०२.०९.२०२४ रोजीपर्यंत उपलब्ध असून, ऑनलाईन निविदा दि. ०२.०९.२०२४ रोजी पर्यंत सायं.१६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि. ०२.०९.२०२४ रोजी सायं. १६.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.
ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/३५९/२०२४-२५
दि:२३.०८.२०२४
**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**
सही/-
नगर अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -
■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: १०००/- मागासवर्गीय: ९००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिंटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)




पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/ OBC/EWS: 500/- SC/ST/ ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर
■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिंटेंडंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिंटेंडंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

## भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा
■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: दिल्ली
■ Fee: General/OBC: ४००/- SC/ST/PWD/ExSM²: २००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

## केंद्रीय लोकसेवा आयोग

■ पदाचे नाव :
१ डेप्युटी सुपरिंटेंडिंग आर्कियोलॉजिस्ट ६७
२ केबिन सेफ्टी इंस्पेक्टर १५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) पदव्युत्तर पदवी (Archaeology/Indian History/-nthropology) (ii) PG डिप्लोमा/ एडवांस डिप्लोमा (Archaeology) किंवा ०३ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) केबिन क्रू म्हणून दहा वर्षांचा अनुभव आणि सध्या केबिन क्रू म्हणून कार्यरत.
■ वयाची अट: ०५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० वर्षांपर्यंत
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: २५/- SC/ST/PH/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM²)
■ अधिकृत वेबसाईट https://upsc.gov.in/

## उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

# जय जय गोपाला.. देवकी नंदन गोपाला...

बंधू-भगिनींनो,श्रीकृष्ण जयंती म्हणजेच जन्माष्टमी,ज्यास हिंदू धर्मात आध्यात्मिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्व आहे.त्यास आपण गोकुळ अष्टमीदेखील म्हणतो.यासंदर्भात आख्यायिका अशी आहे की,श्रावण मासात रोहिणी नक्षत्रावर मथुरानगरीत कंसाच्या बंदिवासात देवकीच्या उदरी बाळ श्रीकृष्णचा जन्म झाला अन् जणू दुष्ट-अत्याचारी, मानवसंहारी कंस या राक्षसाचा सर्वनाश करणारा देवअवतारी उदयास आला.

श्रीकृष्णाचा जन्म हा खऱ्या अर्थाने कंस मामाचा नाश ; शिशुपालचे शंभर अपराध माफ करून पुढे सुदर्शनचक्राने कृष्णाने त्याचा केलेला शिरच्छेद ; दौपद्री वस्त्रहरण रोकण्यासाठी तिला श्रीकृष्णाने दिलेला मदतीचा हात अन् महाभारतातील कौरवांच्या अहंकारी व जुलूमी साम्राज्याचा रणभूमीवर शेवट करण्यासाठी श्रीकृष्णाने अर्जुनाचा सारथी बनून बजावलेली अहम भूमिका या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

श्रीकृष्णाच्या जन्मासंदर्भात आणखी एक महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे मां देवकीच्या पोटी झालेला बाळ श्रीकृष्णचा जन्म आणि मां यशोदाने केलेलं बाळ श्रीकृष्णचे पालनपोषण! या द्वय महान मातांनी आई या नात्याने बजावलेले पवित्र उत्तरदायित्व..आजही समस्त मातांना पथदर्शक ठरत आहे.आम्ही सर्वजण भगवान श्रीकृष्ण अन् देवकी-यशोदा या आदर्श मातांना आजच्या या मंगलमय दिनी दंडवत प्रणाम करतो.जय श्रीकृष्ण!

आज देशासह जगभरात जेथे जेथे हिंदूधर्मीय आहेत,ते सर्व मोठ्या धूमधडाक्यात जन्माष्टमी साजरी करतात.गोकुळ अष्टमीच्या दिवशी कृष्णभक्त हे उपवास करतात. या दिवशी हिंदुधर्मीय लोक भगवान श्रीकृष्णच्या मंदिरात जाऊन मुरलीधराच्या नावाने जागरण करत रात्री ठीक १२ वाजता मोठ्या हर्षोल्लासात श्रीकृष्ण जयंती जयघोषात साजरी करतात.याप्रसंगी जय जय गोपाला..देवकी नंदन गोपाला.. वासुदेव नंदन गोपाला.. नंद नंदन गोपाला.. यशोदा नंदन गोपाला! या नावाने भक्तजन गजर करत तल्लीन होऊन नाचत-गात असतात.या मंगलमय दिनी भक्तांच्या आनंदाला जणू उधाणच असलेले असते.काही भक्त तर श्रीकृष्णाची वेशभूषा करून नृत्यगान करून भक्तजनांची टाळ्याच्या कडकडाटाने दाद मिळवत असतात.अशाप्रकारे, नृत्य, नाट्य, कथा, पुराण असे कार्यक्रम जागोजागी सादर होत असतात.वास्तवात हेच खरं हिंदू धर्माचं भगवं प्रतिक आहे.

या वर्षाची गोकुळ अष्टमी अन् गोपाळकाला हे उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होताहेत.मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या महायुती सरकारने दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात व मोकळ्या मनाने साजरा करण्याची गोविंदा पथकांना अनुमती दिली आहे.त्यामुळे गोविंदा पथकांना अत्यानंद झाला असून,त्यांच्या उत्साहाला पारावरच उरलेला नाही.

ठाणे, टेंभी नाका येथे वंदनीय धर्मवीर आनंदजी दिघे यांनी सुरू केलेल्या दहीहंडी कार्यक्रमाची परंपरा त्यांच्या स्मरणार्थ पुढे अशीच चालू राहणार आहेत. मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा दहीहंडीचा कार्यक्रम येथे संपन्न होताहे. तरी ठाणेकरांनी यंदाच्या दहीहंडी कार्यक्रमात स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे,असे आवाहन करण्यात येते.

दहीहंडीच्या कार्यक्रमादरम्यान होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर गोविंदा पथकांच्या आयोजकांनी कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये,यासाठी खबरदारी घ्यावी,जेणेकरून दहीहंडी फोडताना कोणत्याही लहान-मोठ्या गोविंदाच्या जीवाला धोका पोहोचणार नाही.अवाजवी धांगडधिंगा न करता,गोविंदा पथकांनी शिस्तबद्धपणे अन् भक्तिभावाने दहीहंडीचा सोहळा साजरा करावा. दहीहंडीसंदर्भात राज्य शासनाने घालून दिलेले नियम गोविंदा पथकांनी काटेकोरपणे पाळावेत.त्यामुळे सणाचे पावित्र्य अबाधित रहाते अन् त्याला कुठलाही गालबोट लागत नाही.गोविंदा पथकांनी शेवटच्या थरावर असलेल्या छोट्या गोविंदाची विशेष काळजी घ्यावी.कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गोविंदा पथकांनी पोलीस दलाला सर्वोतोपरी सहकार्य करावे. संयम,शिस्त व समन्वय ठेऊन दहीहंडी उत्सव साजरा करावा म्हणजे श्रीकृष्ण जयंती साजरी करणे आध्यात्मिकदृष्ट्या फलद्रूप होईल. जय श्रीकृष्ण!

गोविंद,गोविंद हरे मुरारी....
हे नाथ नारायण वासुदेव..
-रणवीरसिंह राजपूत,ठाणे/नंदुरबार

# जगातील सर्वात धोकादायक आजार, शरीराच्या नाजूक भागांवर करतो परिणाम

# पुन्हा लागणार लॉकडाऊन?

तुम्ही अनेक प्रकारच्या विषाणूंबद्दल ऐकले असेल, त्यापैकी एक करोना होता ज्याने संपूर्ण जगाला त्रास दिला होता. या विषाणूमुळे मोठ्या संख्येने लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. याच क्रमाने मंकीपॉक्सच्या विषाणूनेही जगात आपले पाय पसरवले आहेत. आतापर्यंत डझनहून अधिक देशांना याचा फटका बसला आहे आणि मंकीपॉक्सची अनेक प्रकरणे येथे नोंदवली गेली आहेत. अशा परिस्थितीत, आपण देखील या विषाणूपासून सुरक्षित राहणे आवश्यक आहे, ज्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. त्याच वेळी, आपल्याला त्याच्या लक्षणांबद्दल जागरूक असले पाहिजे कारण ते हलके घेतले जाऊ शकत नाहीत. जागतिक आरोग्य आणीबाणी घोषित केल्यानंतर जगात मांकीपॉक्सची भीती वाढली आहे. भारतही याबाबत सतर्क आहे. सर्वांना सावध राहण्याचा सल्ला दिला जात आहे. काही गोष्टी लक्षात ठेवल्यास हे टाळता येऊ शकते. चला तर मग जाणून घेऊया काय आहेत मंकीपॉक्सची लक्षणे.



### मंकीपॉक्सपासून आपण स्वतः चे संरक्षण कसे करू शकतो?

■ जर तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीच्या एखाद्याला मंकीपॉक्स झाला असेल, तर सर्वप्रथम तुम्ही ज्याला त्याचा त्रास होत असेल त्यापासून दूर राहावे.
■ संक्रमित व्यक्तीला वेगळे करा
■ स्वच्छतेची विशेष काळजी घ्या आणि वारंवार हात धुवा
■ शारीरिक संबंध टाळावेत.
■ डॉक्टरांशी संपर्क साधा आणि लस घ्या.

केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी नुकतीच मंकीपॉक्सच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. अधिक खबरदारी घेण्यासाठी काही उपाययोजना कराव्यात, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

जसे की सर्व विमानतळ, बंदरे आणि ग्राउंड क्रॉसिंगवर आरोग्य सुविधांना संवेदनशील करणे. चाचणी प्रयोगशाळा, कोणतीही प्रकरणे शोधण्यासाठी, वेगळे करण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी आरोग्य सुविधा तयार




करण्याचा निर्णय घेण्यात आला.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, हा विषाणू सध्या मध्य आफ्रिकेत आणि आसपास असल्याने, भारतातील सीमावर्ती भागात पाळत ठेवणे आणि तपासणी सुरू करणे आवश्यक आहे. जर कोणी बाधित देशांतून येत असेल तर त्याची चाचणी करावी, जेणेकरून हा संसर्ग भारतात पोहोचू नये. स्वच्छता आणि सावधगिरी बाळगून हा आजार टाळता येतो.

जर तुम्हाला जास्त ताप येत असेल तर ते मंकीपॉक्सचे लक्षण असू शकते. याशिवाय स्नायू दुखणे, पाठदुखी, सूज येणे, लाल पुरळ येणे आणि या पुरळांवर खाज येणे, तीव्र डोकेदुखी लक्षात ठेवा की जर तुम्हाला वरीलपैकी कोणतीही लक्षणे दिसली तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तुमच्या एका छोट्याशा चुकीमुळे हा व्हायरस तुम्हाला पकडू शकतो. म्हणून, लक्षणे दिसू लागताच आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधा.




# गुलिगत सूरज चव्हाणची होणार मराठी चित्रपटात दमदार एण्ट्री

'बिग बॉस मराठी'च्या नव्या पर्वाने सर्वत्र धुमाकूळ घालायला सुरुवात केली आहे. यंदाच्या 'बिग बॉस मराठी'च्या नव्या पर्वात एका स्पर्धकाने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. संपूर्ण महाराष्ट्राला भुरळ घालणारा हा स्पर्धक म्हणजेच टिक टॉक स्टार सूरज चव्हाण. सूरजने अल्पावधीतच प्रेक्षकांची मन जिंकत त्यांच्यावर राज्य केलं. 'बिग बॉस'च्या घरात सूरजचा खेळ पाहून सर्वत्र त्याचं कौतुक होताना पाहायला मिळत आहे. खेळ समजला नसला तरी माणुसकी जपत, सगळ्यांची मन जपत आणि तोडीस तोड उत्तर देत सूरज स्वतःला 'बिग बॉस'च्या घरात सिद्ध करताना दिसतोय.

छोट्याशा खेडेगावातून आलेल्या सूरजने झगमगाटीच्या दुनियेत स्वतःचं असं स्थान स्वतः मिळवलं. सध्या 'बिग बॉस मराठी' मुळे सूरज भलतात चर्चेत आलेला पाहायला मिळतोय. रिॲलिटी शोद्वारे सूरज जरी आता प्रेक्षकांच्या भेटीला आला असला तरी तो आता मोठ्या पडद्यावर ही झळकण्यास सज्ज होताना पाहायला मिळणार आहे. लवकरच सूरज त्याच्या आगामी 'राजाराणी' या चित्रपटातून मोठा पडदा गाजवताना दिसणार आहे. काही दिवसांपूर्वीच 'राजाराणी' या चित्रपटाच्या पोस्टरने साऱ्यांचीच मन जिंकली. सूरज आता सत्य घटनेवर आधारित उलगडणार्या या प्रेम कथेतून महत्वपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात मुख्य कलाकाराच्या दोस्ताच्या भूमिकेत सूरजला पाहणं फारच रंजक ठरणार आहे.

चित्रपटात प्रमुख भूमिकेत रोहन पाटील आणि वैष्णवी शिंदे ही कलाकार मंडळी दिसणार आहेत. तर चित्रपटातील रोहनच्या मित्राच्या भूमिकेत महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात भारत गणेशपुरे, सुरेश विश्र्वकर्मा, माधवी जुवेकर, भक्ती चव्हाण, शिवाजी दोलताडे, तानाजी गलगुंडे या कलाकारांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. 'सोनाई फिल्म क्रिएशन' प्रस्तुत 'राजाराणी' या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, गीतलेखन व निर्मिती गोवर्धन दोलताडे यांनी केली आहे. तर चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी शिवाजी दोलताडे यांनी सांभाळली आहे. संगीत दिग्दर्शन पी. शंकरम, पार्श्र्वसंगीत विजय नारायण गवंडे, गायक आदर्श शिंदे, हर्षवर्धन वावरे, अनविसा दत्तगुप्ता, नागेश मोरवेकर हे आहेत. तर छायांकन कृष्णा नायकर, एम. बी. अलीकट्टी यांनी केले आहे. सूरजचा 'राजाराणी' हा चित्रपट १८ ऑक्टोबर २०२४ पासून जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

विद्यार्थ्यांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची असून शिक्षक व शाळा व्यवस्थापनाने

# कार्यशाळेतील मार्गदर्शनाची व माहितीची अंमलबजावणी करावी : पालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़

कल्याण : विद्यार्थ्यांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची असून शिक्षक व शाळा व्यवस्थापनाने या कार्यशाळेतील मार्गदर्शनाची व माहितीची अंमलबजावणी करावी असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी केले. आयुक्तांच्या प्रेरणेतून व त्यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत, विद्यार्थी सुरक्षा व व्यवस्थापनाची भूमिका या महत्त्वपूर्ण विषयासंदर्भात माहिती देण्यासाठी काल दुपारी कल्याण (प) येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे आयोजिलेल्या कार्यशाळेत बोलताना आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी हे प्रतिपादन केले.

या कार्यशाळेत महापालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या शाळातील मुख्याध्यापक व शिक्षक यांना लैंगिक गुन्ह्यापासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करण्यासाठी पारित केलेल्या posco कायद्याबाबत व तरतुदींबाबत बाबत मार्गदर्शन करण्यात आले.RTE ते Protection from sexual offence या दोन्ही जबाबदाऱ्या शाळेने पार पडणे किती महत्त्वाचे आहे हे महापालिकेच्या शिक्षण विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी आपल्या प्रास्ताविकात स्पष्ट केले.

कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश प्रदीप अष्टुरकर यांनी पोस्को कायदा त्याची गरज व तो केव्हा अंमलात आला, त्यातील महत्त्वपूर्ण बाबी, तरतुदी याबाबत अत्यंत सविस्तर व तपशिलवार माहिती उपस्थित शिक्षकांना दिली,तसेच आपल्या कणखर शब्दांत पोस्को कायद्याचे गांभीर्य व त्याबाबतची न्यायालयीन प्रक्रिया देखील क्रमवार स्पष्ट केली.

मानपाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राम चोपडे यांनी ज्या बालकावर अत्याचार झाला आहे अशा बालकाचे वर्तन लक्षात घेऊन त्याला विश्वासात घेऊन त्याच्याशी कसे बोलावे याबाबत पोलीस विभाग अवलंबत असलेली





कार्यपद्धती व शाळांनी घ्यायची दक्षता याबाबत माहिती दिली, तर ड. रचना भोईर यांनी मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २००२ याबाबत उपस्थिताना अवगत केले.

सेंट जोसेफ हायस्कूल डोंबिवली येथील प्राचार्य अर्चना रॉड्रिक्स यांनी शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली तसेच मुख्याध्यापकांची जबाबदारी व भूमिका ,पालक सभेतून पालकांचे समुपदेशन या कायद्याबाबत जागृती घडविण्यासाठी व विद्यार्थी लैंगिक अत्याचारास बळी पडू नये म्हणून पालकांचा सहभाग व त्यांच्यात जाणीव जागृती करणे या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करून मार्गदर्शन केले.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी विजय सरकटे यांनी पोस्को कायद्याच्या जाणीव जागृतीसाठी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने दि.२१ ऑगस्ट २०२४ निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची माहिती उपस्थित शिक्षकांना पीपीटीच्या माध्यमातून दिली. शिक्षकेतर कर्मचारी नियुक्ती बाबतचे निकष, तक्रारपेटी, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती इत्यादीचे गठन याबाबत देखील सविस्तर मार्गदर्शन त्यांनी केले.

जिल्हा व सत्र न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश विलास डोंगरे यांनी त्यांच्या सेवा कालावधीत पॉस्को कायद्यासंदर्भात आलेली प्रकरणे याबाबत थोडक्यात माहिती व विद्यार्थी सुरक्षिततेे बाबत असलेल्या कायद्यांची माहिती उपस्थितांना दिली.

या कार्यशाळेतील विषयांबाबत उपस्थिती शिक्षकांना असलेले प्रश्न, शंका व अडचणी यांचे निराकरण व्यासपीठावरील मार्गदर्शकांकडून करण्यात आले तसेच शिक्षकांनी घ्यावयाची दक्षता त्यांना येणाऱ्या किंवा भविष्यात येऊ शकणाऱ्या अडचणी याबाबत आयुक्त डॉ इंदु राणी जाखड़ यांनी प्रश्नोत्तरांच्या सत्रात चर्चा करून करून शंकांचे निरसन केले.





पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब ह्याच्या आदेशाने शहरप्रमुख सचिन पाटील ह्यांच्या नेतृत्वाखाली बदलापूर येथील घटनेचा दिवा शहरात काळ्या फिती तोंडाला बांधून आणि काळे झेंडे घेऊन निषेध आंदोलन करण्यात आले. ह्यावेळेस विधानसभा विधानसभा संघटिका योगिता नाईक, महिला शहर संघटिका ज्योती पाटील, महिला शहर समन्वयक प्रियंका सावंत, युवा सेना शहराधिकारी अभिषेक ठाकूर, उपशहर संघटिका स्मिता जाधव, विभागप्रमुख चेतन पाटील, मच्छिंद्र लाड, हेमंत नाईक, संजय जाधव, रवी रसाळ, विनया कदम, उपशहर अधिकारी सुयोग राणे, उमेश शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# ठाण्यातील १ लाख महिला ठरल्या पात्र

■ ठाणे पालिकेमार्फत झाली छाननी प्रक्रिया ■ पहिल्या टप्प्यात ९५ हजार महिला झाल्या होत्या पात्र

**ठाणे: राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'साठी अर्ज केलेल्या महिलांच्या, दुसऱ्या टप्प्यातील एक लाख अर्जांची छाननी ठाणे महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अहोरात्र काम करून वेळेत पूर्ण केली आहे. त्यामुळे आता ठाण्यातील एकूण लाभार्थी महिलांची संख्या सुमारे २ लाख झाली आहे.**

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या निर्देशानुसार महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांचे आवश्यक मनुष्यबळ तसेच संपूर्ण तांत्रिक व्यवस्था महापालिका मुख्यालयात तीन सभागृहात सज्ज करण्यात आली होती. येथे तीन दररोज तीन सत्रांमध्ये अखंडीतपणे काम करून जमा झालेल्या सर्व अर्जांची विगतवार ऑनलाईन तपासणी करण्यात आली. त्यासाठी संगणक संचांचे अद्ययावत नेटवर्क तयार करण्यात आले होते.

अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या नेतृत्वाखाली उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (समाजविकास) अनघा कदम, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी विवेक चौधरी यांनी प्रत्येक सत्रात होणाऱ्या अर्ज पडताळणीचे नियोजन केले. त्यात सूत्रबद्धता आणून जलद गतीने काम मार्गी लावले. त्याचबरोबर, महापालिकेच्या सर्व, नऊ प्रभाग समिती कार्यालयांत सहायक आयुक्त यांनीही अशाच प्रकारचे नियोजन केल्याने अर्ज छाननी प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यात आली.

राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीसाठी ठाणे महापालिकेने प्रभाग समितीनिहाय १३७ मदत केंद्रे सुरू केली आहेत. या सर्व मदत केंद्रांवर आलेले अर्ज तसेच ऑनलाईन प्राप्त झालेले अर्ज यांची ऑनलाइन पद्धतीने पात्रता निश्चिती करण्यात आली. त्यात, ठाणे महापालिका हद्दीतील अर्जांचा समावेश होता.

ठाणे महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी छाननीचे काम अतिशय वेगाने आणि नियोजनबध्द रीतीने केले. त्यामुळे दोन्ही टप्प्यात मिळून आतापर्यंत सुमारे दोन लाख महिला लाभार्थी झाले आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत त्यात आणखी भर पडेल, असा विश्वास, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी व्यक्त केला आहे.

## बदलापूरच्या घटनेची नायगावमध्ये पुनरावृत्ती

### ७ वर्षीय चिमुकलीवर शाळेच्या कँटीन चालकाकडून लैंगिक अत्याचार

**वसई: बदलापूर येथील शाळेतील दोन चिमुकल्या मुलींवर सफाई कर्मचार्यांकडून झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाची पुनरावृत्ती नायगाव मध्ये घडल्याचे उघडकीस आले आहे. नायगावच्या शाळेत उपहागृहात काम करणार्या १६ वर्षीय विधिसंघर्षग्रस्त बालकाने ७ वर्षांच्या चिमुकलीवर ४ ते ५ वेळा लैंगिक अत्याचार केला आहे. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी आरोपी विधिसंघर्षग्रस्त बालकाला अटक केली आहे.**

पीडित मुलगी या शाळेत दुसऱ्या इयत्तेत शिकते. २२ ऑगस्ट रोजी ती शाळेतील कँटीनमध्ये जाण्यास तयार नव्हती. कँटीनमध्ये काम करणारा अंकल मला त्रास देतो असे तिने शिक्षिकेला सांगितल्यानतंर हा प्रकार शिक्षिकेने मुख्याध्यापकांना सांगितला. त्यांनी लगेच या मुलीची विचारपूस केली तेव्हा मागील १५ दिवसांमध्ये शाळेच्या आवारात उपहारगृह (कँटीन) मध्ये काम करणारा १६ वर्षीय तरुण या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करत असल्याचे तिने सांगितले. विशेष म्हणजे एकदा मुलीने आपल्या घरी देखील याची माहिती दिली होती परंतु त्यांनी तेव्हा गांभिर्याने घेतले नव्हते. मुख्याध्यापक यांनी त्वरीत याबाबतची माहिती नायगाव पोलिसांना दिली. या प्रकरणाची माहिती मिळातीच आम्ही आरोपी विधिसंघर्षग्रस्त बालकाला पोक्सोच्या गुन्ह्याखाली अटक केली आहे, अशी माहिती नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी दिली.

या शाळेत तिवारी नामक व्यक्ती कँटीन चालवतो. आरोपी असलेला विधीसंघर्षग्रस्त बालक दोनच महिन्यांपूर्वी उत्तर प्रदेशातून येथे काम करण्यासाठी आला होता. पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रण (फुटेज) तपासणीसाठी ताब्यात घेतले आहे. अन्य मुलींसोबत असा प्रकार घडला का त्याचा देखील पोलीस तपास करत आहेत. मुलीचे पालक तक्रार देण्यासाठी तयार नव्हते. मात्र मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी हा प्रकार दडवून न ठेवता पोलिसांना माहिती दिली.

आमच्या शाळेत मुलांच्या सुरक्षिततेची पुर्ण काळजी घेतली जाते. या शाळेत ६५ ते ७० सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. घडलेला प्रकार दुर्देवी आहे. त्यामुळे आम्ही स्वत:हून पोलिसांकडे तक्रार दिली, असे मुख्याध्यापकांनी सांगितले.

# इस्कॉन मंदिरातील सोहळ्यामुळे वाहतूक कोंडीची शक्यता

ठाणे : बाळकुम येथे काही महिन्यांपूर्वी इस्कॉन मंदिर उभारण्यात आले आहे. कृष्ण जन्माष्टमी निमित्ताने या मंदिरात ५० हजाराहून अधिक भाविक दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भागातील बाळकुम, कापूरबावडी, कोलशेत, ढोकाळी भागात मोठ्या कोंडीची शक्यता व्यक्त केली जात आहे. वाहतुक कोंडी टाळण्यासाठी ठाणे वाहतुक पोलिसांनी रविवारी आणि सोमवारी या दोन दिवसांसाठी वाहतुक बदल लागू केले आहेत.

बाळकुम येथील पिरॅमल वैकुंठ परिसरात इस्कॉन मंदिर आहे. या मंदिरात दररोज नागरिक दर्शनासाठी जात असतात. सोमवारी कृष्ण जन्माष्टमी आहे. त्यामुळे इस्कॉन मंदिरामध्ये जन्माष्टमी साजरी केली जाणार आहे. ठाणे जिल्ह्यासह विविध भागातून रविवारी (आज) पासून सोमवारी भाविक या मंदिरारामध्ये दर्शनासाठी येण्याची शक्यता मंदिर प्रशासनाने व्यक्त केली आहे. बाळकुम, कोलशेत, ढोकाळी भागात गेल्याकाही वर्षांमध्ये मोठी गृहसंकुले उभी राहिली आहेत. त्यामुळे येथे नागरी वस्ती देखील वाढली आहे.

तसेच याच भागात ठाणे महापालिकेचे सेंट्रल पार्क हे उद्यान आहे. या उद्यानात देखील नागरिक येत असतात. असे असले तरी येथील रस्ते अद्यापही अरुंद आहेत. त्यामुळे वाहन चालकांना कोंडीचा सामना सहन करावा लागतो. इस्कॉन मंदिरातील कार्यक्रमांमुळे भाविकांची वाहने आल्यास त्याचा परिणाम येथील वाहतुक व्यवस्थेवर होऊन कोंडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वाहतुक कोंडी टाळण्यासाठी ठाणे वाहतुक पोलिसांनी या भागात वाहतुक बदल लागू केले आहेत. रविवारी (आज) सकाळी ७ वाजल्यापासून सोमवारी रात्री ११ वाजेपर्यंत हे वाहतुक बदल लागू असणार आहे.

### असे आहेत वाहतुक बदल

कोलशेत रोड येथील कल्पतरू पार्क जवळील राम मारूती रोड मार्गे बाळकूमच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना या मार्गावर प्रवेशबंदी असेल. येथील वाहने ढोकाळी नाका मार्गे वाहतुक करतील.

पिरॅमल वैकुंठ, बाळकुम प्रवेशद्वार क्रमांक एक समोरील राम मारूती रोड मार्गे कोलशेतच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना दादलानी चौकात प्रवेशबंदी असेल. येथील वाहने दोस्ती वेस्ट कौन्टी प्रवेशद्वारजवळून वळण घेऊन वाहतुक करतील.

कोलशेत गाव येथील जलवाहिनी मार्गे तसेच दोस्ती वेस्ट कौन्टी प्रवेशद्वार येथून सेवा रस्ता मार्गे बाळकुमच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना दोस्ती वेस्ट कौन्टी प्रवेशद्वार येथे प्रवेशबंदी असेल. येथील वाहने कोलशेत रोड, लोढा अमारा मार्गे वाहतुक करतील.

यशस्वी नगर, हायलँड चौकातुन जलवाहिनी मार्गे पिरॅमल वैकुंठ येथून बाळकुम, कोलशेतच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना राधाकृष्ण स्वीट समोरील चौकात प्रवेशबंदी असेल. येथील वाहने यशस्वीनगर मार्गे वाहतुक करतील.

साकेत, बाळकुमनाका येथून राम मारूती रोड मार्गे कोलशेतच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या सर्व वाहनांना बाळकुम नाका येथे प्रवेशबंदी असेल. येथील वाहने माजिवडा- मानपाडा प्रभाग समिती, हायलँड रोड मार्गे वाहतुक करतील.

भिवंडी, दादलानी येथून राम मारूती रोड मार्गे कोलशेतच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना दादलानी चौकात प्रवेशबंदी असेल. येथील वाहने बाळकुम नाका मार्गे वाहतुक करतील.

दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहनांना हायलँड येथील मैदानात त्यांची वाहने उभी करता येणार आहेत.

# नवी मुंबई पालिकेचे मोरबे धरण काठोकाठ भरले

नवी मुंबई : नवी मुंबई शहराला जलसमृद्धता बहाल करणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणाची पाणी साठवण क्षमता १९०.८९० द.ल.घ.मी. इतकी असून, विसर्ग पाणी पातळी तलांक ८८ मी. इतकी आहे. मोरबे धरण परिसरातही जोरदार पाऊस पडत धरण केव्हाही भरण्याची शक्यता असल्याचे त्यामुळे नवी मुंबई महापालिकेने धरणातून केव्हाही विसर्ग होण्याची शक्यता असून त्याबाबत खालापूर तहसीलदारांना पत्र दिले असून योग्य ती खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस पडत असून २५ ऑगस्ट २०२४ रोजी, दुपारी १ वाजेपर्यंत मोरबे धरणात १८५.१५१ द.ल.घ.मी. इतका पाणी साठा झालेला आहे, तसेच पाणी पातळी तलांक ८७.४० मी. इतकी झालेली आहे. सततच्या सुरु असलेल्या पावसामुळे व सतत असाच पाऊस सुरु राहील्यास पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार सुरु राहून धरणाची पाणी पातळी ८७.८५ मी. इतकी झाल्यास, धरणाचे दोन्ही वक्राकार दरवाजे कोणत्याही क्षणी उघडण्यात येऊन, जादाचे पाणी मूळ धावरी नदी पात्रात सोडण्यात येईल असे खालापूर तहसीलदार व स्थानिक पोलीस प्रशासन यांस नवी मुंबई महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाच्या वतीने पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. तसेच त्यानंतरही, धरणाची पाणी पातळी ८८ मी. तलांक इतकी राखण्यासाठी वेळोवेळी आवश्यकतेनुसार पाण्याचा विसर्ग करणेत येईल असेही सूचित करण्यात आले आहे.

धावरी नदीच्या तीरावरील विशेषत: चौक, जांभिवली, आसरे, धारणी, तुपगाव, आसरोटी, कोपरी या नदीकाठावरील व पाताळगंगा नदीवरील इतर गावांतील संबंधित सरपंच, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील यांना व गावातील नागरिकांना धरणातुन पाण्याचा विसर्ग सुरु केल्यानंतर, नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होईल, याबाबत तहसीलदार कार्यालयाकडून सतर्कतेबाबत अनुषंगिक सुचना देण्याचे कळविण्यात आलेले आहे. तसेच या दरम्यान कोणत्याही प्रकारे वाहत्या पाण्यात नागरिकांनी व पर्यटकांनी प्रवेश न करण्याबाबत आणि नदीच्या पात्रात उतरण्यास व पोहण्यास मज्जाव करणेबाबत तहसीलदारांच्या व स्थानिक पोलीस प्रशासनाच्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात असेही सूचित करण्यात आले आहे.

# कळवा आणि ठाण्यातील ४४८३ गोविंदांना विमा पॉलिसीचे सुरक्षा कवच : आनंद परांजपे



ठाणे : ठाणे राष्ट्रवादी काँग्रेसने सामाजिक बांधिलकीपोटी दहिहंडी उत्सवाच्या निमित्ताने कळवा आणि ठाण्यातील ४४८३ गोविंदांना ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे विमा पॉलिसिचे सुरक्षा कवच दिले असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनानुसार, राष्ट्रवादी काँग्रेसने सामाजिक बांधिलकीपोटी दहिहंडी उत्सवाच्या निमित्ताने ठाणे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने कळवा आणि ठाण्यातील ४४८३ गोविंदांना ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे विमा पॉलिसीच्या रुपाने सुरक्षा कवच दिलेले आहे. ही पॉलिसी देताना गोविंदा पथकातील तरुण मित्रांना एकच विनंती आहे की, सुरक्षेच्या सर्व बाबींची काळजी घ्या, कोणालाही दुखापत होणार नाही अशा उत्साहात दहिहंडी उत्सव साजरा करुया. इन्शुरन्स काढण्यासाठी जी काही मदत लागेल त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस संपूर्ण सहकार्य करेल. दुर्दैवाने कोणताही अपघात झाल्यास सर्व गोष्टी ओरिएंटल इन्शुरन्सने कव्हर केलेल्या आहेत. माझे सहकारी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस नजीब मुल्ला व मी अशा आम्ही दोघांनी मिळून ठाणे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने ओरिएंटल इन्शुरन्सची ही विमा पॉलिसी राबविली जात आहे.दहिहंडी असोसिएशन, महाराष्ट्र राज्यचे मनापासून आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी ओरिएंटल इन्शुरन्स विमा पॉलीसीचे वाटप, करताना व्यक्त केली.

ठाणे तसेच कळवा परिसरातील ४४८३ गोविंदांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे शहर (जिल्हा) मध्यवर्ती कार्यालय, फ्लॉवर व्हॅली कॉम्प्लेक्स, विवियाना मॉल समोर, ठाणे येथे शुक्रवारी, ओरिएंटल इन्शुरन्स विमा पॅलिसिचे वाटप प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना गोविंदा पथकातील सदस्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांना ओरिएंटल इन्शुरन्स विमा पॉलिसी काढून दिल्याबद्दल आभार मानले. याप्रसंगी 'दहिहंडी उत्सवाचा विजय असो', 'बोल बजरंग बली की जय' आदी जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी दहिहंडी असोसिएशन, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष समीर पेंढारे, असोसिएशनचे सदस्य दिगंबर चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे शहर जिल्हा सरचिटणीस प्रभाकर सावंत, रविंद्र पालव आदी मान्यवर उपस्थित होते.

पनवेल पालिकेच्यावतीने 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' उपक्रमांतर्गत

# पर्यावरणपूरक'श्री गणेश मूर्ती विक्री केंद्र सुरू

पनवेल: पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा उपक्रमांतर्गत 'पर्यावरणपूरक श्री गणेश मूर्ती विक्री केंद्र ' पनवेल मध्ये सुरू करण्यात आले आहे. नागरिकांना या गणेश मूर्ती विक्री केंद्रामध्ये पर्यावरणपूरक अशा शाडू मातीच्या मूर्ती माफक दरात मिळणार आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी या केंद्रास भेट देऊन गणेश मुर्ती खरेदी कराव्यात असे महापालिकेच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार सर्व सण व उत्सव पर्यावरणपूरक साजरे करणे बंधकारक आहे.गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील सर्वात महत्वाचा सण





आहे. त्यामुळे महापालिका कायक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला जास्तीत जास्त चालना देण्यासाठी मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी माझी वसुंधरा ४.० अंतर्गत महापालिकेच्यावतीने यावर्षीही 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' मोहिम हाती घेतली आहे. या अंतर्गत उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना माफक दरात शाडू मुर्ती उपलब्ध करून देण्यासाठी पनवेल शहरातील कुंभारवाड्यातील मुर्तीकारांना शाडूपासून गणेश मुर्त्या तयार करण्याबाबत बैठक घेऊन चर्चा करण्यात आली होती. त्यानुसार महापालिकेच्यावतीने महापालिका कार्यक्षेत्रातील दहा गणेश मुर्तीकारांना जुलै महिन्यात मोफत बारा टन शाडूची माती उपलब्ध करुन देण्यात आली होती.

पनवेल मधील छ. शिवाजी महाराज चौकातील पाण्याच्या टाकीजवळ पर्यावरणपूरक श्री गणेश मूर्ती विक्री केंद्रामध्ये गिरीधर मुर्ती प्रशिक्षण व कला केंद्र , श्री गणेश कला केंद्र, युसुफ मेहर अली सेंटर यांच्या संयुक्त विद्यमानातून मुर्तीकारांनी तयार केलेल्या मुर्त्या विक्रीस ठेवण्यात आल्या आहेत. येत्या ७ सप्टेंबरपासून श्री गणेशोत्सव सुरू होत असून, नागरिकांनी या केंद्राला भेट देऊन आपली पर्यावरणपूरक गणेश मुर्ती डव्हान्स बुकिंग करून ठेवावी असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. जेणे करून पर्यावरणाची हानी होणार नाही. गणोशोत्सव साजरा करताना केवळ पर्यावरणपूरक गणेश मुर्तीच नाही तर गणपती बाप्पाची सजावट देखील पर्यावरणपूरक करून गणेशाची आराधना व पर्यावरण रक्षणाची जबाबदारी अशा दोन्हींची ही मंगलमय सांगड घालून या वर्षीच्या गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित करुया असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१